सत्र खटला क्र. २८/२०२५
सरकार –वि– अनिल सवडे
नि.क्र. ६६

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक –११

मी शपथेवर खरे सांगतो की,

नांव — भारत आनंदराव चिरडे,

वय– ४० वर्षे, धंदा – पोउपनि, पो.स्टे.अंजनगांव सुरजी

रा. अंजनगांव सुरजी ता.जि. अमरावती.

सरतपास सरकार तर्फे श्री. व्ही.एल. भटकर, सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत.

०१. दि.०३.११.२०२४ रोजी मी पो.स्टे. देऊळगांव राजा येथे पो.उप.नि. म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी फिर्यादी प्रभाकर कचरुबा सवडे यांनी आरोपी विरुध्द त्यांचा मुलगा रामेश्वर यांचा खुन केल्याबाबत तक्रार दिली होती. तक्रारी प्रमाणे ही घटना दि.२८.१०.२०२४ ते २९.१०.२०२४ पर्यंतचे मध्यरात्रीपर्यंत झाली होती. आधी सदर प्रकरणामध्ये एसआय सुरेश मांटे यांनी अनैसर्गीक मृत्यू झाल्याचे तपास केलेला होता. त्यांनी तपासामध्ये घटनास्थळ पंचनामा, मरणोत्तर पंचनामा, अनैसर्गीक मृत्यु रजिष्टर मध्ये नोंद घेतली होती. माझेकडे अनैसर्गीक मृत्यु झाल्याची माहिती, त्याबाबतचा उतारा नोंद, घटनास्थळ पंचनामा आणि मरणोत्तर पंचनामा इत्यादी कागदपत्रे तपासकामी प्राप्त झाली होती. त्यानंतर मी आरोपीला अटक केली. अटक फॉर्म आता मला दाखविण्यात आला. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकुर खरा असुन बरोबर आहे. त्यास नि.क्र.६७ देण्यात येत आहे. आरोपीला अटक करणे पुर्वी मी त्याचे नातेवाईक यांना सुचनापत्र दिले होते. सदर सुचना पत्र आता मला दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा असुन बरोबर आहे त्यास नि.क्र. ६८ देण्यात येत आहे. त्यानंतर मी आरोपीची वैद्यकिय तपासणी करणे करीता वैद्यकिय अधिकारी, देऊळगांव राजा, यांना पत्र दिले होते. सदर पत्र आता मला दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि.क्र. ६९ देण्यात येत आहे. तसेच आरोपीचा वैद्यकिय अहवाल हस्तगत केला. नंतर नि.क्र. ५५ प्रमाणे सार्वजनिक बांधकाम

विभाग, देऊळगांव राजा, यांना सरकारी पंच मिळणे करीता पत्र दिले होते. त्याअनुषंगाने संबंधीत विभागाकडून पंच नियुक्तीचे पत्र प्राप्त झाले. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. त्यावर संबंधीत विभागाचे अधिकारी यांची सही आहे. ( या दस्तऐवजास आरोपीचे वकीलांची निशाणी देण्यास हरकत नसल्यामुळे, त्याला नि.क्र. ७० देण्यात येत आहे). त्याप्रमाणे पंच दि. ०५.११.२०२४ रोजी आले होते. त्यावेळी आरोपी पोलिस कोठडीत असतांना पंचासमक्ष स्वखुशीने निवेदन देऊन गुन्ह्यामध्ये वापरलेला भगव्या रंगाचा शेला आणि दुचाकी वाहन काढून देण्याचे सांगीतले. ते दुचाकी वाहन त्याने त्यांच्याच घरी उभे केल्याचे सांगीतले होते. त्यानुसार आम्ही आरोपीचे निवेदन तयार केले. तो निवेदन आता मला दाखविण्यात आले. त्यावर माझी, आरोपीची व दोन पंचांची सहया आहे. त्यातील मजकुर खरा असून बरोबर आहे. त्यास नि.क्र. ७१ देण्यात येत आहे. निवेदनातील अधोरेखांकित भाग "अ" आरोपीने सांगीतला होता. आरोपीचे निवेदना प्रमाणे, मी, दोन्ही पंच व इतर पोलिस अधिकारी आरोपीसह शासकिय वाहनाने पो. स्टे. मधुन निघालो. आरोपीने आम्हास जाफ्राबाद रोडने गाडी घेण्यास सांगीतले व एका पुलाजवळ ती गाडी थांबविण्यास सांगीतले. त्यानंतर आरोपीने सांगीतले की, ज्या रुमालाने त्याने मृतकाचा गळा आवळला तो त्यांनी त्या पुलाखाली टाकला होता. म्हणुन आम्ही सर्व त्या रुमालाचा शोध घेण्यासाठी पुलाखाली उतरलो. तेंव्हा आम्ही पाहिले की, तो रुमाल एका काडीला अटकलेला होता. आरोपीने तो रुमाल ओळखला म्हणून तो रुमाल आम्ही पंचासमक्ष जप्त केला. तो रुमाल मी ओळखु शकतो. रुमाल आर्टिकल "अ" आता मला दाखविण्यात आला. हा तोच आहे. नंतर आरोपीने शासकिय वाहन त्याचे गाव नानखेड कडे नेण्यास सांगीतले. तेथे आरोपीने एका घराचे समोर शासकिय वाहन थांबविण्यास सांगीतले. तेथे वाहन क्र. एमएच–२१–बीबी–४१३९ हा उभा होता. त्याने सांगीतले की, तोच वाहन त्याने गुन्ह्याचे वेळी वापरला होता. तो वाहन सुध्दा आम्ही पंचनासमक्ष तपासकामी जप्त केला. जप्ती पंचनामा नि.क्र. ५० आता मला दाखविण्यात आला. त्यावर माझी, पंचांची व आरोपीची सहया आहेत. त्यातील मजकुर खरा असून बरोबर आहे. त्यानंतर पोलिस

स्टेशनला परत येऊन जप्त केलेला मुद्देमाल हेड मोहरर यांचेकडे जमा केला. झडती व जप्ती पंचनामा नि.क्र. ५३ आता मला दाखविण्यात आला. प्रस्तुतच्या पंचनाम्याप्रमाणे आरोपीकडुन वीवो कंपनीचा मोबाईल जप्त केला होता. त्या मोबाईलमध्ये दोन सिम होते. या पंचनाम्यावर माझी, दोन पंचांची व आरोपीची सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. जप्त मोबाईल मी ओळखु शकतो. आर्टिकल "ई" वरील जप्त मोबाईल आता मला दाखविण्यात आला. हा तोच मोबाईल आहे. मुद्देमाल पावती आता मला दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा असुन बरोबर आहे. ती नि.क्र. ७२ वर आहे. दि. ०७.११.२०२४ रोजी आरोपीने सदरील गुन्हा करतेवेळी घातलेले कपडे मी पंचासमक्ष जप्त केले होते. त्यामध्ये एक गोल गळ्याचे टि शर्ट, एक हिरव्या रंगाची शाँडो बनियान व एक काळ्या रंगाची लोअर होता. सदरचा पंचनामा नि.क्र. ५१ आता मला दाखविण्यात आला. त्यावर माझी, दोन पंच व आरोपीची सहया आहेत. त्यातील मजकुर खरा असून बरोबर आहे. ते कपडे मी ओळखु शकतो. आता मला सदर कपडे आर्टिकल ब,क,ड दाखविण्यात आले. हे तेच कपडे आहे. त्याच दिवशी वैद्यकिय अधिकारी यांनी आरोपीचे रक्ताचे नमुने काढुन पोकॉ गणेश जायभाये यांचेकडे दिले होते. ते नमुने मी त्यांचेकडुन जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केला होता. सदरचा पंचनामा नि.क्र. ५२ आता मला दाखविण्यात आला. त्यावर माझी, पंचांची व गणेश जायभाये यांच्या सह्या आहेत. त्यातील मजकुर खरा असुन बरोबर आहे. आरोपीचे कपडे व रक्ताचे नमुने हेड मोररकडे जमा केले. आता मला सदर मुद्देमाल पावती दाखविण्यात आली त्यावर माझी सही असुन मजकुर खरा व बरोबर आहे त्यास नि.क्र. ७३ देण्यात येत आहे. त्यानंतर मृतकाचे रक्ताचे नमुने आणि त्याचे कपडे तसेच आरोपीचे रक्ताचे नमुने रासायनिक विश्लेषणासाठी अमरावती येथे पाठविले. त्याबद्दलचे तीन पत्र आता मला दाखविण्यात आले. त्यावर माझ्या सहया असुन मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे नि.क्र. ७४ ते ७६ देण्यात येत आहे. त्यानंतर मी साक्षीदार व फिर्यादी यांचे बयान नोंदवीले. मी फिर्यादी प्रभाकर सवडे यांचे बयान त्यांनी सांगीतले प्रमाणे नोंदवीले होते. त्यांनी त्यांचे

बयानामधील अधोरेखांकीत भाग–अ सांगितला होता. त्यास नि.क्र. ७७ देण्यात येत आहे. तसेच मी साक्षीदार संदिप सवडे यांचे बयान त्यांनी सांगीतले प्रमाणे नोंदवीले होते. त्यांनी त्यांचे बयानामधील अधोरेखांकीत भाग–अ सांगितला होता. त्यास नि.क्र. ७८ देण्यात येत आहे. जप्त केलेली दुचाकी आरोपीचे वडीलांचे नावावर असल्यामुळे सदरचे वाहन न्यायालयाचे आदेशानुसार त्यांना सुपूर्तनाम्यावर दिले होती. त्याचा सुपूर्तनामा बाँड आता मला दाखविण्यात आला त्यास नि.क्र. ७९ देण्यात येते. नंतर न्यायालयाला पत्र देऊन बीएनएसएस चे कलम १८३ प्रमाणे फिर्यादीचे बयान नोंदविले होते. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही असुन मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि.क्र. ८० देण्यात येत आहे. (येथे आरोपी व त्याचे विद्वान वकील यांचे समक्ष विद्वान सरकारी वकील यांनी फिर्यादीचा न्यायालयाचे समक्ष झालेल्या बयानाचे सिलबंद पाकीट उघडुन दाखविले.) हा तोच बयान आहे त्याला नि.क्र. ८१ देण्यात येत आहे. त्यानंतर वैद्यकिय अधिकारी देऊळगांव राजा यांना क्युरी पत्र देऊन मृतकाचे गळ्यावर आलेले व्रण, हे जप्त केलेल्या रुमालाने होऊ शकतात किंवा नाही, या बाबत विचारणा केली. सदर पत्र आता मला दाखविण्यात आले त्यावर माझी सही असुन मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि.क्र. ८२ देण्यात येत आहे. त्यानुसार त्यांनी त्यांचा अहवाल देऊन कळविले होते की, मयताचे गळ्यावर झालेले व्रण त्या रुमालामुळे होऊ शकतात. तो अहवाल आता मला दाखविण्यात आला त्यावर सबंधीत वैद्यकिय अधिकारी यांची सही आहे. (सदर अहवालाला आरोपीचे विद्वान वकील यांची निशाणी क्रमांक देण्यास हरकत नसल्यामुळे, त्याला नि.क्र. ८३ देण्यात येत आहे). प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपी सोबत असलेल्या वि.सं.बा याला त्याचे आई–वडीलांचे समक्ष ताब्यात घेऊन बाल न्यायमंडळ, बुलडाणा येथे हजर केले. तपासादरम्यान आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळून आल्यामुळे सदरचे दोषारोपपत्र दाखल केले. आज तो न्यायालयात हजर आहे. मी त्यास ओळखतो.

उलटतपास आरोपी तर्फे श्री. बनकर, वकील यांचे मार्फत सुरु.

०२. हे खरे नाही की, मी फिर्यादी व इतर साक्षीदारांचे बयान त्यांनी सांगीतले

प्रमाणे लिहीले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी बयानातील अधोरेखांकित भाग–अ सांगीतले नव्हते. हे खरे आहे की, साक्षीदार रंजना सवडे हिचे पोलिस बयानावर दिनांक ०७/११/२०२४ असे नमुद आहे. हे खरे नाही की, सदर आरोपीने पोलिस कोठडीत असतांना कोणतेही निवेदन दिले नव्हते. हे खरे नाही की, मी सांगीतले प्रमाणे आरोपीचे निवेदनावरुन आम्ही तो रुमाल व दुचाकी जप्त केली नाही. हे खरे नाही की, तो निवेदन तसेच जप्ती पंचनामे मी पंचासमक्ष तयार न करता पोलिस स्टेशन येथे बसुन तयार केले. हे खरे नाही की, मी चुकीचा तपास करुन आरोपी विरुध्द खोटा दोषारोपपत्र दाखल केले.

उलटतपास पुर्ण. फेरतपास काही नाही.

वा.दा.ब. अ.क.क.

ASHOK GURUDASMAL SANTANI
Digitally signed by ASHOK GURUDASMAL SANTANI
Date: 2026.03.11 11:06:19 +0530

(ए. जी. संतानी)
जिल्हा न्यायाधीश क्र. २
बुलडाणा

समक्ष

ASHOK GURUDASMAL SANTANI
Digitally signed by ASHOK GURUDASMAL SANTANI
Date: 2026.03.11 11:06:25 +0530

(ए. जी. संतानी)
जिल्हा न्यायाधीश क्र. २
बुलडाणा

दिनांक : १०/०३/२०२५.